y

# आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ०२३.
E-mail : dycomminspection.@gmail.com Fax No. 22662370. Tel. No. 22640802.

अतिमहत्वाचे / प्राथम्याचे

वाचले : १) शासन, गृह विभागाची क्र. एमआयएस ०३१५/प्र.क्र.५७/राऊशु-३, दि. १९/०३/२०१५ ची अधिसुचना.

२) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र. एआरएम ११२०१२/१/नफा प्रमाण/५-ब, दि.१९/०३/२०१५ चे परिपत्रक.

## परिपत्रक

विषय : दिनांक १९ मार्च, २०१५ पासुन राज्यातील सर्व सीएल-२ अनुज्ञप्तीधारकांनी करावयाच्या देशी मद्याच्या विक्री संदर्भातील सुचना.

मुंबई, दि.२० मार्च, २०१५.

क्रमांक : सीएलआर १११५/दे.म.वि./४/७

या विभागातील सर्व अधीक्षकांना सुचित करण्यात येते की, शासन गृह विभागाच्या उपरोक्त दि.१९/०३/२०१५ च्या अधिसुचनेनुसार देशी मद्याच्या उत्पादन शुल्कात बदल करण्यात आल्यामुळे देशी मद्याच्या एमआरपी मध्ये बदल झाला आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयाने दि.१९/०३/२०१५ च्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत.

यास्तव राज्यातील सर्व देशी मद्याची घाऊक विक्री करणारे (सीएल-२) अनुज्ञप्तीधारक हे त्यांच्याकडे दि. १९/०३/२०१५ पुर्वी संबंधीत देशी मद्यांच्या निर्माणींकडुन आलेला देशी मद्य साठा हा त्यावरील छापील जुन्या एमआरपी दरानुसारच विक्री करतील, तसेच ततपश्चात प्राप्त होणारे देशी मद्य हे त्यावरील छापील नवीन एमआरपी दरानुसारच विक्री करतील, या बाबतची दक्षता घेण्यास संबंधीत कार्यक्षेत्रिय निरिक्षक / दुय्यम निरिक्षक यांना आपल्या स्तरावर आदेशीत करण्यात यावे.

T/30/3/15

या संदर्भात देशी दारु किरकोळ व्यापारी संघटना, कोल्हापूर यांच्या कडुन प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने असे सुचित करण्यात येते की, सीएल-२ अनुज्ञप्तीधारकाने जर रोखीने / ऑन

विभागीय उप-आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क,
नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय
आवक क्रमांक ...383...
दिनांक ...26/3/2015...
विभाग ..........

पध्दतीने त्यांच्याकडचे दि.१९/०३/२०१५ पुर्वीचे देशी मद्य विक्री करतांना त्यावरील छापील जुन्या एमआरपी दरापेक्षा अतिरिक्त दर संबंधीत सीएल-३ व संबंधीत सीएल/एफएल/टीओडी-३ अनुज्ञप्तीधारकांना आकारला तर संबंधीत सीएल-२ अनुज्ञप्तीधारका विरुध्द तातडीने नियमानुसार कार्यवाही करावी.

( एस. डी. शिंदे )
आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१ ) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
२ ) सर्व सीएल-२ अनुज्ञप्तीधारक
३) सर्व सीएल-३ अनुज्ञप्तीधारक
४) सर्व सीएल/एफएल/टीओडी-३ अनुज्ञप्तीधारक

प्रत माहितीसाठी अग्रेषित.

१) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
२) सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
३) या कार्यालयातील कार्यासन क्र. १, ३, ४, ५, ७, ९, १० व १२ (५ प्रती).